11 AUG 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिवीरांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त क्रांतिवीरांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. क्रांतीवनामधील स्मारकास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पचक्र वाहून भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आहुती देणाऱ्या क्रांतिवीरांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

क्रांतिदिनानिमित्त विद्यापीठाच्या प्रांगणात वृक्षारोपण आणि समूह राष्ट्रगीत झाले. तसेच ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या 'अनामिका' या देशासाठी आहुती देणाऱ्या तमाम अनाम क्रांतिवीरांना समर्पित कवितेचे वाचन डॉ. भारती पाटील यांनी केले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.




कोल्हापूर : क्रांतिदिनी शिवाजी विद्यापीठातील क्रांती वनातील स्मारकास अभिवादन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. आर. व्ही. गुरव, अभय जायभाये आदी.

सकाळ



कोल्हापूर : क्रांतिदीनानिमित्त मंगळवारी (ता. ९) शिवाजी विद्यापीठातील क्रांतिवीरांच्या स्मारकास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अभिवादन केले. या वेळी त्यांच्यासोबत विद्यापीठातील अधिकारी, प्र-कुलगुरू उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिकारकांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ९ ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त क्रांतिवीरांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. वृक्षारोपण आणि समूह राष्ट्रगीत गायन असे उपक्रम झाले. विद्यापीठाच्या क्रांतिवनामधील स्मारकास सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पचक्र वाहून भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आहुती देणाऱ्या क्रांतिवीरांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. या वेळी कवी कुसुमाग्रज यांच्या 'अनामिका' या देशासाठी आहुती देणाऱ्या तमाम अनाम क्रांतिवीरांना समर्पित कवितेचे वाचन डॉ. भारती पाटील यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते क्रांतिवनामध्ये विविध रोपे लावली. समूह राष्ट्रगीत गायन करण्यात आले. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते. विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांनी संयोजन केले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिवीरांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त क्रांतिवीरांच्या स्मृतींना भावपूर्ण वातावरणात मंगळवारी अभिवादन करण्यात आले. .

विद्यापीठाच्या क्रांतीवनामधील स्मारकास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पचक्र वाहून भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आहुती देणाऱ्या क्रांतिवीरांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

पुढारी



कोल्हापूर : कॉमर्स कॉलेजमध्ये नव्याने बांधलेल्या पुष्पा देशपांडे- राशिवडेकर अत्याधुनिक सभागृहाच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, रजनीताई मगदूम. डॉ. विश्वनाथ मगदूम, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील आदी.

# नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आवश्यक

## कुलगुरू शिर्के; कॉमर्स कॉलेजमध्ये पुष्पा देशपांडे सभागृहाचे उद्‌घाटन

कोल्हापूर : शिक्षणाच्या केंद्रस्थानी विद्यार्थ्यांना आणण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये नवीन बांधलेल्या पुष्पा देशपांडे- राशिवडेकर या अत्याधुनिक सभागृहाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम अध्यक्षस्थानी होत्या. कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरण संस्था आणि विद्यार्थ्यांना स्वयंविकासाचे अवकाश खुले करून देणारे आहे. संस्थेचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.व्ही. ए. पाटील यांनी केले. यावेळी संचालक ॲड. वैभव पेडणेकर, ॲड. अमित बाडकर, प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अश्विनी मगदूम यांनी केले. उपप्राचार्य प्रा.बी. टी. नाईक यांनी आभार मानले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठातर्फे 'स्वराज्य महोत्सव'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक कार्यालयातर्फे आजादी का अमृतमहोत्सव आणि विद्यापीठाचा हीरक महोत्सव अशा संयुक्त निमित्ताने आज, गुरुवार ते बुधवार (दि.१७)पर्यंत 'स्वराज्य महोत्सव' साजरा होणार आहे. या महोत्सवांतर्गत विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांमध्ये 'हर घर तिरंगा' या मोहिमेच्या अनुषंगाने प्रचार व प्रसार मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये यांनी दिली. या महोत्सवाचा समारोप बुधवारी सकाळी ९ ते ११ या वेळेत प्रभात फेरीने होईल. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सांस्कृतिक सभागृहात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या उपस्थितीत समारोपाचा कार्यक्रम होणार आहे.

महोत्सवात आज, गुरुवारी देहदान, अवयवदान, नेत्रदान, रक्तदान या अनुषंगाने प्रबोधन शिबिर होईल. शुक्रवारी राष्ट्रभक्तिपर पोवाडा, लोकगीते, लोकनृत्ये, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण होणार आहे. शनिवारी विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, पथनाट्य, निबंध, चित्रकला स्पर्धा होणार आहे.

11 AUG 2022

जनसंपर्क कक्ष
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातर्फे स्वराज्य महोत्सव आजपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सहसंचालक कार्यालय कोल्हापूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवानिमित्त 'स्वराज्य महोत्सव'चे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते १७ ऑगस्ट या कालावधीत हा महोत्सव होणार असल्याची माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये यांनी दिली.

स्वराज्य महोत्सवांतर्गत विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांमध्ये 'हर घर तिरंगा' या मोहिमेच्या अनुषंगाने प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे. गुरुवार, दि. ११ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत देहदान, अवयवदान, नेत्रदान, रक्तदान प्रबोधन शिबिर होईल. १२ ऑगस्टला राष्ट्रभक्तीपर पोवाडा, लोकगीते, लोकनृत्ये, देशभक्तीपर गीते सादरीकरण होईल. १३ ऑगस्टला सकाळी ९ ते ११ या वेळेत शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, पथनाट्ये यांच्या आयोजनासह निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धांचे आयोजन केले आहे. १४ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत प्रत्येक गावातील स्वयंसेवकाला त्याच्या गावातील ऐतिहासिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, नैसर्गिक साधनसंपत्ती तसेच प्रमुख समस्या या विषयीची माहिती महाविद्यालयांद्वारे संकलित करण्यात येणार आहे. १५ ऑगस्टला सकाळी ९ ते ११ या वेळेत महाविद्यालयांमार्फत प्रत्येकी ७५ स्वयंसेवकांची प्रभात फेरी आयोजित करण्यात येणार आहे. तसेच सहसंचालक कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

१६ ऑगस्ट रोजी भारतीय लष्कर, नौदल व वायू दल तसेच पोलिस अधिकारी यांच्या अनुभवांच्या कथनाचा कार्यक्रम शिवाजी विद्यापीठामार्फत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत प्रभात फेरीने स्वराज्य महोत्सव उपक्रमाचा समारोप विद्यापीठात होईल. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सांस्कृतिक सभागृहात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होईल. सर्व महाविद्यालयांनी या कार्यक्रमास मोठा प्रतिसाद देऊन स्वराज्य महोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन जायभाये यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 AUG 2022
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा लांबणीवर

## आज पेपर नाही; सातारा,सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने बुधवार आणि गुरूवारच्या सर्व परीक्षा स्थगित केल्या आहेत. त्यामुळे विविध ६१ अभ्यासक्रमांच्या ४१ हजार ५४२ विद्यार्थ्यांची परीक्षा लांबणीवर पडली आहे.

गेल्या चार दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या या पूरपरिस्थितीमुळे पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर येण्यास आणि जाण्यास अडथळा निर्माण होत आहे. काही भागामध्ये विजेचा पुरवठा खंडित होत आहे. इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अडथळा येत आहे. सलग पाऊस सुरू असल्याने या अडचणींमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. ते लक्षात घेऊन विद्यापीठाने बुधवार, गुरूवार रोजी होणाऱ्या बी. कॉम., बी. ए., एम. ए., एम. कॉम., बी. व्होक आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत. या परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहीर केले जाईल, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. दरम्यान, सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात घेण्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी जूनमध्ये आंदोलन केले. त्यावेळी विद्यापीठाने काही अपरिहार्य कारणास्तव सर्व परीक्षा स्थगित केल्या होत्या.

### स्थिती पाहून पुढील निर्णय

पाऊस आणि पूर स्थिती पाहून परीक्षांबाबतचा पुढील निर्णय आज, गुरुवारी घेतला जाणार आहे. नियोजनानुसार शुक्रवार (दि. १२) पासून परीक्षा होतील, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

पुढारी





सागर गावंडे प्रतीक कळविकट्टे

# सागर गावंडे, प्रतीक कळविकट्टे यांची निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील विद्यार्थी सागर संतोष गावंडे (रा. अकोला) आणि प्रतीक मारुती कळविकट्टे (रा. कोल्हापूर) यांची देशातील नामांकित व अग्रेसर संस्थांमध्ये पीएच.डी.साठी निवड झाली आहे.

सागर यांची निवड आयआयएसइआर, मोहाली येथे 'जैविक विज्ञान' या विषयामध्ये .तर प्रतीक यांची आयआयटी, मुंबई येथे 'ऊर्जा विज्ञान आणि अभियांत्रिकी' या विषयामध्ये एकात्मिक पीएच. डी. साठी निवड झाली आहे. दोघांना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ परीक्षा स्थगित

कोल्हापूर : कोल्हापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे अनेक मार्ग वाहतुकीस बंद झाले आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ११ ऑगस्ट रोजी होणाऱ्या सर्व विषयांच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत.

मार्च/एप्रिल २०२२ मधील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध परीक्षा केंद्रांवर सुरू आहेत. विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये उद्‌भवलेल्या पूरस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये, यासाठी दि. १० व ११ ऑगस्ट रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. या संदर्भातील पत्र www.unishivaji.ac.in-Exam Section - Circulars या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पुण्यनगरी



सागर गावंडे



प्रतीक कळविकट्टे

# विद्यापीठाच्या दोघांची पीएच.डी.साठी निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील विद्यार्थी सागर संतोष गावंडे (रा. अकोला) आणि प्रतीक मारुती कळविकट्टे (रा. कोल्हापूर) यांची देशातील नामांकित व अग्रेसर संस्थांमध्ये पीएच.डी. साठी निवड झाली आहे. त्यांनी बी.एस्सी. नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी हा पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२ मध्ये पूर्ण केला आहे. सागर यांची आयआयएसइआर, मोहाली येथे 'जैविक विज्ञान' या विषयामध्ये तर प्रतीक यांची आयआयटी, मुंबई येथे 'ऊर्जा विज्ञान आणि अभियांत्रिकी' या विषयामध्ये एकात्मिक पीएच.डी.साठी निवड झाली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस पाटील यांच्यासह नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दोघांचे अभिनंदन केले.

पुण्यनगरी

# पूर परिस्थितीमुळे विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित

## बुधवार आणि गुरुवारच्या पेपरबाबत निर्णय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या विद्यापीठ स्तारावरील परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने सुरू आहेत. कोल्हापूरसह सांगली व सातारा जिल्ह्यांतील अतिवृष्टीमुळे बुधवार, दि. १० व गुरुवार, दि. ११ ऑगस्ट या दोन दिवसाच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. या दिवशीच्या परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठाकडून यथावकाश प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्राच्या एकूण ७४१ अभ्यासक्रमाच्या परीक्षांपैकी विद्यापीठ स्तरावरील ५६१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १९ जुलैपासून सुरू आहेत. सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा तिन्ही जिल्ह्यांतील विविध परीक्षा केंद्रांवर सुरू आहेत. विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये उद्‌भवलेल्या पूर परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर येण्या-जाण्यास अडथळा निर्माण होत आहे.

काही भागामध्ये विजेचा पुरवठा खंडित होण्याची शक्यता आहे. तसेच इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अडथळा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी दि. १० व ११ ऑगस्ट रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. याबाबतची माहिती महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था तसेच अधिविभागातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांना परीक्षा विभागाने कळवली आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठामार्फत स्वराज्य महोत्सव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सहसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव अशा संयुक्त कार्यक्रमानिमित्ताने ११ ते १७ ऑगस्ट या कालावधीमध्ये 'स्वराज्य महोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. स्वराज्य महोत्सवांतर्गत विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांमध्ये हर घर तिरंगा या मोहिमेच्या अनुषंगाने प्रचार व प्रसार मोहीम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये यांनी दिली.

11 AUG 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'विद्यार्थी कल्याण'चा ३१६ जणांना लाभ

## ३ कोटी ७५ हजारांची मदत; पालक, कर्मचारी यांना मदतीचा आधार

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने कल्याण निधी योजनेचा लाभ ३१६ जणांना झाला. यात विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा समावेश आहे. या सर्वांना सुमारे ३ कोटी ७५ हजारांची मदत दिली आहे. यातील बहुतांशी जणांनी कोरोनात आप्तजण गमावले आहेत. त्यामुळे विद्यार्थी कल्याण निधी हा विद्यापीठाशी संबंधित घटकांना मदतीचा आधार ठरला आहे.



विद्यार्थी विकास विभागाच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी कल्याण निधी ही योजना राबवली जाते. यासाठी विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शंभर रुपये घेतले जातात. तसेच शिक्षक, कर्मचारी यांच्याकडूनही निधी घेतला जातो. नैसर्गिक कारणांमुळे जर विद्यार्थ्याचा मृत्यू झाला तर त्याच्या पालकांना दीड लाखाची मदत केली जाते. जर विद्यार्थ्याच्या पालकाचे निधन झाले तर विद्यार्थ्याला ७५ हजारांची मदत केली जाते. जर विद्यार्थ्याचे दोन्ही पालकांचे निधन झाले तर त्या विद्यार्थ्याला दीड लाखाची मदत केली जाते. अशाच प्रकारची मदत शिक्षक आणि कर्मचारी यांनाही केली जाते.

| २०२० ते २०२१ या कालावधीतील मदत | |
|---|---|
| विद्यार्थी, विद्यार्थिनी | १३ |
| पालक | ३२ |
| प्रशासकीय कर्मचारी | १२ |
| शिक्षक | २ |
| एकूण | ५९ |
| दिलेली रक्कम | ६६ लाख |

| २०२१ ते २०२२ या कालावधीतील मदत | |
|---|---|
| विद्यार्थी, विद्यार्थिनी | २० |
| पालक | २०१ |
| शिक्षक, कर्मचारी | ३६ |
| एकूण | २५७ |
| दिलेली रक्कम | २ कोटी, ३४ लाख, ७५ हजार |

### विद्यार्थी विकास विभागाची कामगिरी

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने दोन वर्षात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले. लवकरच विभागाचे स्वतंत्र ५०० बेडची क्षमता असणारे वसतिगृह, विभागाची स्वतंत्र इमारत, अडीचशे क्षमतेचे सभागृह अशा वास्तू उभ्या राहणार असून याचे आराखडे मंजूर आहेत. विभागाचे स्वतःचे ग्रंथालयही सुरू होत असून त्यासाठी पुस्तक खरेदीही झाली आहे.

> विद्यार्थी विकास विभागाने 'बेटी बचाव बेटी पढाव' या उपक्रमांतर्गत मोठे काम केले आहे. रांगोळी, वक्तृत्व आणि पोस्टर स्पर्धा या माध्यमातून विद्यार्थ्यांनी प्रबोधनाचे काम केले आहे. कल्याण निधीच्या माध्यमातूनही अनेक विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांना आर्थिक आधार मिळाला आहे.
>
> – प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, संचालक, विद्यार्थी विकास विभाग

सकाळ

# विद्यापीठाची आजची परीक्षाही स्थगित

कोल्हापूर : अतिवृष्टीमुळे शिवाजी विद्यापीठाचे उद्या (ता. ११) होणारे पेपर स्थगित केले आहेत. दरम्यान, आज होणारेही पेपर स्थगित केले होते. या दोन दिवसांत स्थगित केलेल्या पेपरचे स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव यांनी पत्रकाद्वारे दिली. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील पूरस्थितीमुळे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने बुधवार आणि गुरुवार या दिवशी होणारे पेपर स्थगित केले आहेत.

तरुण भारत

# नॅनोसायन्सच्या विद्यार्थ्यांची आयआयटीत पीएच.डी.साठी निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातील



सागर गावंडे



प्रतिक कळविकट्टे

विद्यार्थी सागर गावंडे (रा. अकोला) आयआयएसइआर, मोहाली येथे तर आणि प्रतिक कळविकट्टे (रा. कोल्हापूर) यांची मुंबई आयआयटीमध्ये पीएच. डी. साठी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

सागर आणि प्रतिक यांनी बी. एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी हा पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२ मध्ये पूर्ण केला. IIT-JAM ही प्रवेश परीक्षेत सागर याने भारतात १५२ तर प्रतिक याने ५६७ वे स्थान मिळवले. सागरची आयआयएसइआर, मोहाली येथे 'जैविक विज्ञान" या विषयासाठी तर प्रतिकची मुंबई आयआयटी येथे 'ऊर्जा विज्ञान आणि अभियांत्रिकी" या विषयामध्ये एकात्मिक पीएच.डी. साठी निवड झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
11 AUG 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पावसामुळे विद्यापीठाचे पेपर पुढे ढकलले

## परिपत्रक जाहीर : १० व ११ ऑगस्ट रोजीच्या पेपरचे नवीन वेळापत्रक संकेतस्थळावर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. परंतू कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने बुधवार, १० व गुरुवार, ११ रोजी होणारे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. या पेपरचे नवीन वेळापत्रक यथावकाश विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात



येणार आहे, अशी माहिती परिपत्रकाद्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या ऑफलाईन वस्तुनिष्ठ परीक्षा सुरू आहेत. सध्या कोल्हापूर जिल्ह्यात पावसाचा जोर वाढल्याने पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी विद्यार्थ्यांना येण्या-जाण्यासाठी अडचणी येत आहेत. तसेच इंटरनेट कनेक्टिव्हीटीचा अडथळा येण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी बुधवार, १० व गुरुवार ११ रोजी होणारे पेपर स्थगित करण्यात आले आहेत. स्थगित पेपरचे नवीन वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहेत, याची नोंद महाविद्यालय, शिक्षणसंस्था, अधिविभाग, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा संचालक डॉ. जाधव यांनी केले आहे.

Times of India

# SUK cancels exam on two days amid rain, flood

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur (SUK) has cancelled the exams for the summer semester scheduled for Wednesday and Thursday due to the heavy rain and flood-like situation in Sangli, Satara and Kolhapur districts.

The SUK will take a stock of the flood situation on Thursday to decide whether to continue with the rest of the schedule or make any changes, including cancellations.

Students have to be physically present at the exam centre to write the university exam papers. The exam centres are the colleges under the jurisdiction of the university.

Ajiitsinha Jadhav, director of the board of exams at SUK, said, "The roads are waterlogged, several localities are facing flooding. The rivers are flowing above the flood lines. In such a situation, it is difficult for the buses, autos or even the private vehicles to reach the exam centres. Therefore, we have decided to cancel the exams for Wednesday and Thursday. We will declare the schedule for the exams cancelled later. The students and the colleges will be apprised about it."

**The SUK will take stock of the flood situation on Thursday to decide whether to continue with the rest of the schedule or make changes to it**

The exams for over 550 courses are underway in the university jurisdiction. Over 25,000 students appear every day as per their selected course and subjects. The exams based on multiple choice questions have been started from July 19.